KEEP THE TORCH OF DHAMMA A LIGHT

100 Years
S.N.GOENKA
1924 - 2024

LET IT SHINE BRIGHTLY IN YOUR DAILY LIFE.

साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

# विपश्यना

साधक (मराठी)

बुद्धवर्ष 2566, फाल्गुन पौर्णिमा, 7 मार्च, 2023 वर्ष 6 अंक 12

वार्षिक शुल्क रु. 100/- मात्र (भारताबाहेर पाठविण्यासाठी US $ 50)

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

**धम्मवाणी**

**चिरं तिट्ठतु सद्धम्मो, धम्मे होन्तु सगारवा।**
**सब्बेपि सत्ता कालेन, सम्मा देवो पवस्सतु॥**

*– धम्मसङ्गणी अट्ठकथा (अट्ठसालिनी)-निगमनकथा.*

– चिरस्थायी होवो सद्धर्म! गौरवान्वित होवो सद्धर्म! सम्यकदेव, सर्व प्राणिमात्रांकरीता उचित समयी वर्षा करोत!

## पूज्य गुरुजी श्री सत्यनारायण गोयंकाजींच्या जन्म-शताब्दी वर्षाचा समारोह प्रारंभ

मागील 29 जानेवारी, 2023 ला पूज्य गुरुजींच्या जन्म-शताब्दी वर्षाचा समारोह “विश्व विपश्यना पगोडा”मध्ये सामूहिक साधनेने सुरु झाला तसेच या निमित्ताने पूर्ण वर्षभर चालणाऱ्या कार्यक्रमांची रूपरेषाही प्रस्तुत केली गेली. अशाच प्रकारे साधकही पूज्य गुरुजींबरोबर व्यतीत केलेल्या आपल्या प्रत्यक्ष अनुभवांना आणि प्रेरणाजनक प्रसंगांना वेळोवेळी प्रस्तुत करत राहतील, अशी आशा करीत आहोत. यासाठी आम्ही ही अपेक्षा करतो की आगामी होणाऱ्या सर्व महा-शिबिरांमध्ये जास्तीत जास्त साधक-साधिकांनी सामिल होऊन या पुण्यकार्यात सहभागी व्हावे व याचा भरपूर लाभ घ्यावा. (संपर्क ईमेल: **guruji. centenary@globalpagoda.org**)

समारोह सुरु करण्यासाठी आम्ही आपल्या देशाच्या सन्माननीय प्रधानमंत्रीजींना आमंत्रित केले होते. शासकीय कार्यांच्या व्यस्ततेमुळे ते स्वत: तर येऊ शकले नाहीत परंतु एका उत्साहवर्धक आणि अत्यंत प्रेरणाजन्य पत्रात त्यांनी आपले लिखित उद्गार पाठवून शुभ-कामना प्रकट केल्या आहेत.

अशाच प्रकारे सयाजी ऊ बा खिन यांच्या जन्म-शताब्दी समारोहाप्रसंगी पूज्य गुरुजींद्वारे लिहिलेला प्रेरणाजनक लेख, त्यांच्या स्वत:च्या जन्म-शताब्दी-वर्षनिमित्ताने पुन्हा प्रकाशित करीत आहोत. –संपादक

## या, जन्म-शताब्दीचा महोत्सव साजरा करूयात!

जीवनाने पंच्याहत्तर वसंत पाहिले.

कोणी येऊन म्हणू लागले, आपल्या या जन्मदिवसाच्या वेळी अमृत महोत्सव साजरा करूयात.

अमृत महोत्सव?

म्हणजे, जो आत्तापर्यंत मृत झालेला नाही, त्याचा महोत्सव. पण जो पंच्याहत्तर वसंत पाहून मृत झाला नाही, तो आणखी काही वसंत पाहिल्यानंतर मृत तर होणारच आहे. अशा कुणा मर्त्यधर्मा व्यक्तीचा कसला अमृत महोत्सव?

अमृत महोत्सव त्या परम पूज्य गुरुदेव सयाजी ऊ बा खिन यांचा साजरा केला पाहिजे, ज्यांचे भौतिक-शरीर तर मृत झाले, ज्यांची रूप-काया तर मृत झाली, परंतु आपण आपल्या अगाध श्रद्धेच्या बळावर त्यांच्या यश-शरीराला, त्यांच्या कीर्ति-कायेला मृत होऊ देणार नाही. चिरकाळापर्यंत अ-मृत ठेवू. हाच सार्थक अमृत महोत्सव होईल.

त्यांच्या या प्रथम जन्म शताब्दीच्या पावन वेळी कृतज्ञता विभोर होऊन आपण सर्वांनी मिळून असा संकल्प करूयात की आम्ही त्या युग पुरुष बोधिसत्वाच्या कीर्ति-कायेला चिरस्थायी बनवून ठेवू. केवळ आजचेच नाही, तर पुढील अनेक शतकातील भावी पिढ्यांचे विपश्यी परिवार त्यांचे उपकार विसरणार नाहीत. जोपर्यंत धरतीवर शाक्यमुनी भगवान गौतम बुद्धांची पावन स्मृती जीवित राहिल, तोपर्यंत या बुद्ध-पुत्राच्या असीम उपकारांची यशस्वी स्मृतीही अजरामर राहिल.

उपकार तर ब्रह्मदेश म्यंमाचेही विसरले जाणार नाहीत, ज्याने संतांच्या गुरु-शिष्य परंपरेद्वारे मूळ बुद्धवाणीलाच नाही, तर तथागतांद्वारे मानवजातीला दिली गेलेली त्यांची सर्वात महान भेट कल्याणी विपश्यनेलाही शुद्ध रूपात सुरक्षित ठेवले.

असीम उपकार त्या श्रद्धेय भिक्षु प्रवर लैडी सयाडोंचेही, ज्यांनी अनेक शतकांपासून भिक्षुंद्वारे सुरक्षित ठेवल्या गेलेल्या विपश्यना विद्येला गृहस्थांकरीता केवळ सुलभच बनवले नाही, तर एका गृहस्थ आचार्याला प्रशिक्षितही केले.

असीम उपकार त्या पहिल्या गृहस्थ आचार्य सयातैजींचेही, ज्यांनी या विशिष्ट उत्तरदायित्वाला अत्यंत विलक्षण रूपाने निभावले, की ज्यामुळे लोक या तथ्याप्रति आश्वस्त झाले की एक गृहस्थही मैत्रीसंपन्न कुशल विपश्यनाचार्याची भूमिका सफलतेने पार पाडू शकतो.

आणि मग त्यांच्या प्रमुख शिष्याच्या म्हणजेच सयाजी ऊ बा खिन यांच्या उपकारांचे तर सांगावेच काय! ज्यांच्या अदम्य उत्साहाच्या आणि अपूर्व धर्मसंवेगाच्या फलस्वरूपाने ही मुक्तीदायिनी विद्या आपणा सर्वांना मिळाली. सहस्त्रावधी वर्षांपूर्वी विलुप्त झालेल्या ज्या विपश्यना विद्येला शाक्यमुनी सिद्धार्थ गौतमांनी केवळ आपल्याच नाही, तर अनेकांच्या कल्याणासाठी शोधून काढले होते, ती विद्या थोड्याच शतकांनंतर आपल्या जन्मभूमी भारतातूनच नाही, तर सुवर्णभूमी म्यंमा सोडून इतर ठिकाणांहूनही पुन्हा लुप्त झाली. किती अतूट विश्वास होता सयाजींच्या मनात या पुरातन मान्यतेचा की ही विद्या आता पुन्हा जागेल आणि आपल्या देशात परत जाईल. ते वारंवार म्हणत असत की कल्याणी विपश्यनेच्या पुनर्जागरणाचा डंका वाजला आहे आणि आता आपल्या जन्मभूमीत भारतात हिचे लवकरच पुनरागमन होईल. भारतात यावेळी अनेक पुण्यपारमी संपन्न लोक जन्मले आहेत जे हिचा सहर्ष स्वीकार करतील आणि त्यानंतर ही सकळ विश्वात पसरलेल्या अविद्येच्या अंधकाराला दूर करून उष:कालासमान प्रकटेल आणि असिमीत लोक कल्याण करेल.

ते म्हणत असत की अनेक शतकांपूर्वी म्यंमा या विद्येला प्राप्त करून

भारताचा ऋणी झाला होता. त्याला आता या ऋणाची परतफेड करायची आहे, भारताला विपश्यना विद्या परत करायची आहे. इथे येऊन हे पुनीत कार्य ते स्वत: करू इच्छित होते, परंतु करू शकले नाहीत. इथे येऊ शकले नाहीत. भले सशरीर येऊ शकले नाहीत, परंतु आपल्या धर्मपुत्रासोबत दिव्य शरीराने इथे अवश्य आले आणि आपला धर्म-संकल्प पूर्ण करविण्यात सहायक झाले.

विपश्यी साधक साधिकांच्या मनात हा भ्रम निर्माण व्हायला नको की त्यांना ही अनमोल विद्या कोणा गोयंकाकडून मिळाली आहे. गोयंका तर केवळ माध्यम मात्र आहे. वास्तविकपणे त्याला विपश्यना तर सयाजी ऊ बा खिन यांच्याकडून मिळाली आहे. भारतात येऊन जुलै 1969 मध्ये जेव्हा पहिले शिबिर लावले, तेव्हापासून आत्तापर्यंत प्रत्येक शिबिर लावताना तो याच तथ्याची घोषणा करत आला आहे आणि भविष्यातही करत राहिल. आनापान देत असताना शिबिरात सदैवं त्याची ही धर्मवाणी गर्जत असते :

***"गुरुवर! तेरी ओर से, देऊं धरम का दान।..."***

आणि अशा प्रकारे विपश्यना देत असतानाही -

***"गुरुवर! तेरा प्रतिनिधि, देऊं धरम का दान।..."***

आणि मैत्रीनंतर शिबिर समापन करून आपल्या निवास कक्षात परततानाही-

***गुरुवर! तेरो पुण्य है, तेरो ही परताप।***
***लोगां नै बांट्यो धरम, दूर करण भवताप॥***

इतर सहायक आचार्य देखील हाच टेप लावून शिबिरे घेतात आणि भविष्यात देखील केवळ याच पिढीचे नाही, तर भावी पिढ्यांचे सर्व आचार्यही हाच टेप लावून शिबिरे घेतील. त्यामुळे हे स्पष्ट आहे की शुद्ध विपश्यनेच्या पुन्हा भारतात परतण्याचे आणि भारतातून संपूर्ण विश्वात पसरविण्याचे वास्तविक श्रेय परम पूज्य गुरुदेव सयाजी ऊ बा खिन यांनाच आहे. त्यांचे उपकार कोणताही विपश्यी साधक कसा विसरू शकेल भले!

हे एक ज्वलंत ऐतिहासिक सत्य आहे की जर म्यंमा (बर्मा) नसता तर विपश्यना कायम राहिली नसती. जर विपश्यना कायम राहिली नसती तर लैडी सयाडो नसते. जर लैडी सयाडो नसते तर सयातैजी नसते. जर सयातैजी नसते तर सयाजी ऊ बा खिन नसते आणि जर सयाजी ऊ बा खिन नसते तर गोयंका कुठून आले असते? गोयंका तर सयाजींचाच मानस पुत्र आहे. सयाजी ऊ बा खिनच्या करुण चित्तात भारताचे जुने ऋण फेडण्याचा प्रबळ धर्मसंवेग जागला नसता आणि भारतात तसेच विश्वभरात विपश्यनेच्या प्रसाराची धर्माकांक्षा जागली नसती तर जे काही झाले आहे, ते कसे शक्य झाले असते? द्वितीय धर्मशासनाच्या जागरणात आणि प्रसारणात या महान गृही संताचाच खूप मोठा हात आहे. आपण त्याच्या ऋणातून कसे उतराई होऊ शकतो. खरोखरच,

***रोम रोम कृतज्ञ हुआ, ऋण न चुकाया जाय।***

ऋणमुक्त होण्याचा सर्वप्रथम महत्वपूर्ण उपाय तर हाच आहे की

***जीयें जीवन धर्म का!***

• गुरुदेवांच्या जन्म-शताब्दीच्या पावन प्रसंगी सर्व विपश्यी साधकांनी हा दृढ निश्चय करावा की आम्ही यथाशक्ती धर्माचे जीवन जगू. आम्ही सर्व सयाजी ऊ बा खिन यांचे शिष्य, त्यांचा गौरव अक्षुण्ण ठेवू. धर्मपथावर दृढतापूर्वक चालत आम्ही आपले तर कल्याण साधूच, इतरांच्या कल्याणाचेही कारण बनू. आमची धर्ममयी जीवनचर्या पाहून ज्यांच्यात विपश्यनेप्रति श्रद्धा नाही, त्यांच्यात श्रद्धा जागेल, ज्यांच्यात श्रद्धा आहे, त्यांची श्रद्धा वाढेल. अशा प्रकारे विपश्यनेच्या प्रसाराद्वारे अगणित लोकांच्या कल्याणाचा पथ प्रशस्त होईल.

पूज्य गुरुदेव सयाजी ऊ बा खिन यांच्या असीम मंगल मैत्रीच्या बळावरच मागच्या तीस वर्षांपासून इथे विपश्यनेचा पाया दृढतापूर्वक रोवला गेला आहे. भारतातील प्रत्येक वर्गाच्या, प्रत्येक संप्रदायाच्या लोकांनी तिला सहर्ष स्वीकारले आहे. विश्वभरातील सहा महाद्वीपांच्या छोट्या-मोठ्या शताधिक देशांच्या लोकांनी तिला नि:संदिग्धपणे स्वीकारले आहे आणि ते लाभान्वित झाले आहेत.

इतक्या कमी कालावधीत जे काही झाले आहे त्याचे मी अवमूल्यन करू इच्छित नाही, परंतु जे काही बाकी आहे ते निश्चितच खूप अधिक आहे. जे काही प्राप्त झाले आहे, त्याला आधार मानून विश्वव्यापी विपश्यनेच्या बहुमुखी विकासासाठी आम्ही सर्व बांधिल आहोत. या प्रसंगी आपण खाली दिलेल्या प्रस्तावित योजना पूर्ण करण्यात दृढतापूर्वक सहभागी होऊ की ज्यामुळे सयाजी ऊ बा खिन यांची धर्मकामना पूर्ण करत कल्याणी विपश्यना विद्या आगामी सहस्रावधी वर्षांमध्ये अत्यंत प्रभावशाली रूपाने प्रवेश करेल.

• आत्तापर्यंत भारतात तसेच विश्वभरात विपश्यनेची जितकी केंद्रे स्थापित झाली आहेत आणि ज्यांच्यामध्ये प्रशिक्षण देणे चालू आहे त्यांचा विकास व्हावा आणि जी निर्माणाधीन आहेत त्यांचा निर्माण लवकरात लवकर पूर्ण व्हावा जेणेकरून जास्तीत जास्त लोक यापासून लाभान्वित होत राहतील.

• विश्वातील जास्तीत जास्त लोकांना विपश्यना विद्येचा लाभ मिळावा याकरीता केवळ स्थायी विपश्यना केंद्रांमध्येच नाही, तर अनेक देशांमध्ये अकेंद्रीय स्थानांवर देखील अस्थायी शिबिरे लावली जातात. अशी अकेंद्रीय शिबिरे जास्तीत जास्त ठिकाणांवर आयोजित व्हावीत की ज्यामुळे अधिकाधिक लोक विपश्यनेने लाभान्वित होऊ शकतील.

• भारत, नेपाळ, तैवान, इंग्लड आणि अमेरिका येथील कारागृहांमध्ये संपन्न झालेल्या विपश्यना शिबिरांनी बंदी अपराध्यांमध्ये लक्षणीय सुधारणेची महत्वपूर्ण भूमिका निभावली आहे. हा शिक्षणक्रम या देशांमध्ये तर पुढे चालतच राहो, इतर देशांमध्येही हा शिक्षणक्रम लवकरच सुरु करण्यात यावा.

• भारत आणि नेपाळमध्ये अंध लोकांकरीता आयोजित केलेली शिबिरे अत्यंत सफलतापूर्वक पूर्ण झाली आहेत. अशी शिबिरे केवळ याच नाही, तर इतर देशांमध्येही प्रसारित करण्यात यावीत.

• भारतात कुष्ठ-रोग्यांकरीता विपश्यनेची शिबिरे चालू आहेत ज्यामुळे त्यांच्या मानसिकतेमध्ये बरीच सुधारणा झाली आहे. त्यांच्या हीनभावनेच्या ग्रंथींचे निर्मूलन झाले आहे. विपश्यनेमुळे त्यांच्या जीवनात हास्य फुलले आहे. या क्षेत्रात असेच सफल प्रयोग पुढे चालविण्यात यावेत.

• जुगार, तंबाखू आणि इतर मादक पदार्थांचे अनेक व्यसनी लोक विपश्यनेच्या अभ्यासाने व्यसन-मुक्त झाले आहेत तसेच ड्रग्जच्या व्यसनात वाईट प्रकारे अडकलेले लोकही व्यसनातून बाहेर पडले आहेत. ऑस्ट्रेलिया आणि स्वित्झर्लंडमध्ये सरकारच्या सहयोगाने या दिशेने विपश्यनेद्वारे खूप मोठे काम झाले आहे आणि होत आहे. या लोकोपकारी कार्याला सर्वत्र प्रोत्साहन देण्यात यावे.

• भारतात तसेच इतर अनेक देशांमध्ये प्रायमरीपासून हायस्कूलपर्यंतचे हजारो विद्यार्थी-विद्यार्थिनी आनापानने आणि कॉलेजचे विद्यार्थी विपश्यनेने लाभान्वित होत आहेत. हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर पुढे चालत राहावा जेणेकरून मानव-जातीच्या भावी पिढ्या सुख-शांती, स्नेह-सौहार्द तसेच सद्भावनेचे जीवन जगू शकतील.

• भारतात, विशेषकरून मुंबई शहरामध्ये रस्त्यावर जीवन जगणाऱ्या गरीब, अनाथ, इतरत्र भटकणाऱ्या मुलांवरही आनापानच्या प्रशिक्षणाचा सफल प्रयोग केला जात आहे. त्यालाही प्रोत्साहन दिले गेले पाहिजे.

• पटिपत्ति विपश्यना सद्धर्माचा प्रयोगात्मक पक्ष आहे. याच्या परियत्ति, म्हणजे, सैद्धान्तिक पक्षावर प्रकाश टाकण्यासाठी ज्या विपश्यना विशोधन विन्यासाची स्थापना केली गेली त्याने आपल्या कार्यक्षेत्रात विशिष्ट सफलता प्राप्त केली आहे. मूळ पालि तिपिटक, समस्त अट्ठकथा, टीका आणि अनुटीका तसेच इतर अनेक ग्रंथांसहित विशाल पालि वाङ्मय एका छोट्याशा सघन संचात समाविष्ट करण्यात आले आहे. इतर दुर्लभ पालि ग्रंथही जिथे कुठे उपलब्ध असतील, त्यांनाही यामध्ये सामावून घेण्यात आले पाहिजे. या ग्रंथांचे पुस्तकस्वरूपात प्रकाशनही समाधानकारक गतीने पुढे जात आहे.

• अशाच प्रकारे संस्कृत भाषेतील संपूर्ण धार्मिक वाङ्मयालाही समाविष्ट करण्याचे प्रशंसनीय काम सुरु करण्यात आले आहे. त्याला लवकर पूर्ण करणे आवश्यक आहे. यामुळे शोधकार्य गंभीरतेने पूर्ण होऊ शकेल आणि यातून हे समजू शकेल की ती कोणती कारणे होती, ज्यांच्यामुळे कल्याणी विपश्यना आणि तत्संबंधी सारे साहित्य या देशातून विलुप्त झाले. अशा धोक्यांपासून सावध राहून भारतात परतलेल्या विपश्यनेला आणि तिच्या साहित्याला चिरकाळापर्यंत

सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. असे केल्यानेच गुरुदेवांची ही मंगल कामना पूर्ण होईल- "चिरं तिट्ठतु सद्धम्मो" हे कार्य कोणत्याही इतर संप्रदायांप्रति द्वेषभावना जागवून कदापि केले जाऊ नये. केवळ यथाभूत सत्याचेच शोधकार्य व्हावे. कारण गुरुदेव कायम 'सत्यमेव जयते'या धर्मनीतीचेच पक्षधर होते. त्यांच्या खुर्चीच्या मागे हेच शब्द बरमी भाषेत लिहिलेले असायचे.

• अजून एक अत्यंत महत्वपूर्ण कार्य आहे. हे जे गुरुदेव सयाजी ऊ बा खिन यांच्या ऐतिहासिक स्मारक स्वरूपाने मुंबईमध्ये विशाल 'विपश्यना स्तूपा'चे निर्माण-कार्य सुरु झाले आहे, ते लवकरच पूर्ण करायचे आहे. या स्तूपाचा वापर केवळ विपश्यना साधनेसाठीच होईल. याच्याने गुरुदेवांचे धर्म-स्वप्न पुरे करण्यात सहायता मिळेल. याच्या विशाल धर्मकक्षात हजारोंच्या संख्येने विपश्यी साधक-साधिका, सामूहिक साधनेचा अथवा एक दिवसीय शिबिरांचा लाभ घेत राहतील. अगदी सहज हे अनुमान केले जाऊ शकते की जिथे 50-100 साधकांच्या सामूहिक साधनेने साधकांना इतका लाभ मिळतो, तिथे याच्या तुलनेने हजारोंच्या संख्येने होणारी सामूहिक साधना किती प्रभावशाली आणि लाभदायक होईल. "समग्गानं तपो सुखो"ही भगवद् वाणी प्रत्यक्ष प्रकट होईल. सामूहिक तप सुखदायी सिद्ध होईल.

• या स्तूपाला घेऊन अज्ञ लोकांमध्ये भ्रांती निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्यांना वाटेल की हे एखाद्या संप्रदाय विशेषाचे प्रतीक आहे. परंतु जेव्हा ते पाहतील की या स्तूपात विपश्यना साधनेच्या व्यतिरिक्त कोणतेही सांप्रदायिक कर्मकांड केले जात नाही, इथे धूप-दीप, नैवेद्य तसेच मूर्ती-पूजनाचे नावनिशाणही नाही तेव्हा त्यांची ही भ्रांती आपोआपच दूर होईल.

हे खरे आहे की बाहेरून याला एका स्तूपासारखा आकार न देताही दहा हजार व्यक्तींच्या सामूहिक साधनेसाठी असा एक स्तंभशून्य विशाल हॉल निर्माण केला जाऊ शकतो. तर मग सांप्रदायिकतेची भ्रांती निर्माण करणारी ही स्तूपाची आकृतीच का? लोकांची ही भ्रांतीही खूप काळ टिकू शकणार नाही, जेव्हा ते या सत्यतेशी अवगत होतील की ही आकृती चिरकाळापर्यंत बर्माच्या उपकारांचे स्मरण ठेवण्याकरीता आहे. हा स्तूप त्या धर्म-देशाप्रति आपल्या असीम कृतज्ञतेचे प्रतीक असेल. जेव्हा विपश्यना विद्या भारतातून शेजारील देशांमध्ये गेली तेव्हा तिथल्या लोकांनी त्यांच्या देशात जे प्रारंभिक स्तूप बनवले, ते त्या तत्कालीन भारतातील स्तूपांच्या प्रतिकृतिच होत्या. ते याकरीता बनवण्यात आले होते की जेव्हा-जेव्हा तेथील लोक त्या स्तूपांना पाहतील, तेव्हा-तेव्हा भारताच्या उपकारांना स्मरण करून नतमस्तक होतील. ठीक अशाच प्रकारे इथले लोक श्वेडेगॉनची आकृती असणाऱ्या या स्तूपाला पाहतील तेव्हा तेही सहस्त्रावधी वर्षांपर्यंत बर्माच्या उपकारांचे स्मरण करत राहतील, की त्या देशाने एका अनमोल खजिन्याप्रमाणे ही विद्या चिरकाळापर्यंत सांभाळून ठेवली आणि तसेच हे देखील की त्या देशात सयाजी ऊ बा खिन सारखे संत गृहस्थ जन्मले, ज्यांच्या अदम्य उत्साहामुळे ही पुरातन विद्या भारताला पुन्हा प्राप्त झाली आणि इथून विश्वाच्या काना-कोपऱ्यात पसरली, की ज्यामुळे भारत विश्वगुरु असल्याच्या प्राचीन बिरुदाला पुन्हा प्राप्त करण्यायोग्य बनू शकला. या अर्थाने हा स्तूप आपल्या कृतज्ञतेचे प्रतीक होईल, कोणत्या सांप्रदायिकतेचे नाही. हा स्तूप वास्तविकपणे भारतातील विपश्यनेच्या पुनर्स्थापनेचे भव्य स्मारक होईल. सयाजींच्या महानतेचा कीर्तिस्तंभ होईल.

• आणि स्तूपाच्या बाहेर जी विशिष्ट दीर्घिका (आर्ट-गॅलरी) बनेल, ती शाक्यमुनी गौतम बुद्धांच्या गौरवमय महामानवीय ऐतिहासिक व्यक्तीत्वाला काल्पनिक पौराणिक चिखलातून बाहेर काढून आपल्या उज्ज्वल सत्य स्वरूपात प्रकाशित करेल. यामुळे विश्वात भारताचे मस्तक पुन्हा उंचावेल. ही दीर्घिका अत्याधुनिक श्रवण-दृश्य तंत्राद्वारे अत्यंत आकर्षक पद्धतीने तथागतांच्या जीवनातील अनेक महत्वपूर्ण घटनांबरोबरच विपश्यना विद्येच्या प्राचीन प्रयोगाच्या सत्यतेला प्रकाशित करेल. यामुळे बुद्ध आणि त्यांच्या खऱ्या शिकवणीविषयी देशात पसरलेला अज्ञानाचा अंध:कार दूर होईल आणि मोठ्या संख्येने लोक त्यांनी शिकवलेल्या सांप्रदायिकताविहीन, वैज्ञानिक आणि आशुफलदायिनी विपश्यनेला अंगिकारून आपले कल्याण साधतील. या विशाल आकर्षक स्तूपाला पाहण्यासाठी बाहेरच्या देशांमधून येणारे अनेक लोकही विपश्यना साधनेशी अवगत होतील आणि त्यांच्यातील अनेक जण या देशात अथवा आप-आपल्या देशात परतून विपश्यना साधनेच्या शिबिरांमध्ये भाग घेऊन आपले कल्याण साधतील. अशा प्रकारे विपश्यना विश्वव्यापी होऊन विश्व कल्याण करेल.

हीच तर परम पूज्य गुरुदेव सयाजी ऊ बा खिन यांची पुनीत धर्म कामना होती. या! वरील सर्व योजनांना पूर्ण करून त्यांच्या या मंगलकामनेला पूर्ण करून आपण आपलेही कल्याण साधून घेऊ आणि जना-जनांच्या कल्याणातही सहयोगी होऊ!

कल्याणमित्र,

सत्यनारायण गोयंका

***विपश्यना**, बुद्धवर्ष 2542, फाल्गुन पौर्णिमा, 2 मार्च 1999, वर्ष 28, अंक 9 से साभार*

------------

## मंगल मृत्यू

पूज्य गुरुजींचे तिसरे पुत्र श्री मुरारीलाल गोयंका यांनी 7 फेब्रुवारी 2023 ला त्यांच्या निवास-स्थानी शांतीपूर्वक शरीर सोडले. त्यांनी लहानपणीच पूज्य सयाजी ऊ बा खिन यांच्याकडून साधना शिकून घेतली आणि मध्य-पूर्व भारताच्या रांचीमध्ये इंजिनियरिंगचे शिक्षण घेताना साधना करत राहिले. ते परिवारातील पहिले व्यक्ती होते ज्यांनी गुरुजींबरोबर बोधगयेच्या प्रमुख बुद्ध मंदिरात साधना केली. ते हिमालयाच्या एका शिखरावर स्थित असलेल्या चैलच्या ऐतिहासिक राजभवना (पैलेस हॉटेल) मध्ये लागलेल्या शिबिरात सामिल झाले ज्याच्यात भारतातील तसेच विश्वातील अनेक महत्वपूर्ण व्यक्ती सामिल झाल्या होत्या. एक दिवस दुपारी भोजनाच्या वेळी गुरुजी मुरारींना म्हणाले की "हे शिबिर हत्तींकडून नांगर चालविण्यासारखे आहे."

श्री मुरारींच्या सहयोगाने गुरुजींना विदेशात जाण्याचा पासपोर्ट आणि फ्रान्सचा व्हिसा वेळेवर मिळू शकला. त्यांनी कित्येक पूर्ण किंवा अल्पावधीच्या शिबिरांमध्ये भाग घेतला आणि ट्रस्टी इत्यादींच्या रूपात सेवा दिली. आपल्या या पुण्यबळांच्या फलस्वरूपाने त्यांनी शांतीपूर्वक शरीर सोडले. धर्मपथावर त्यांची उत्तरोत्तर प्रगती होवो आणि ते निर्वाणलाभी होवोत, हीच मंगल कामना.

------------

## ऑनलाइन पालि-हिंदी सर्टिफिकेट कोर्स-2023

प्रवेश-प्रक्रिया 1 ते 31 मार्च 2023 पर्यंत सुरु राहिल. कोर्स-डिटेल्स आणि आवेदन पत्र:- खालील व्हाट्सॲप तसेच लिंक वर- 1 मार्च 2023 पासून उपलब्ध होईल. https://palilearning.vridhamma.org/

कृपया आपल्या चौकशीसाठी व्हाट्सॲप नंबर +91 78219 95737 वर संदेश पाठवावा.

---------

अतिरिक्त उत्तरदायित्व

### केंद्र आचार्यांच्या रूपात सेवा

**1) धम्म अंबिका, नवसारीकरीता**
**श्री केशवलाल पटेल (KP4)**
**2) धम्म नर्मदा, भरूचकरीता**
**श्री जीतूभाई शाह (JS11)**
**3) धम्म सोनगढ, सोनगढकरीता**
**श्री नरेंद्र भरवाडा (NMB)**

### वरिष्ठ सहायक आचार्य

1. श्री मधुकर लामसे, अमरावती
2. श्री प्रह्लाद गजबे, नागपुर
3. श्री मधुकर क्षीरसागर, वरोरा
4. श्रीमती सुनीता शेंडे, नागपुर

नव नियुक्ती

### सहायक आचार्य

1. श्री ज्ञानदेव बोराटे, पुणे
2. श्री आनंद पवार, मुंबई

3-4. श्री स्वप्निल तसेच श्रीमती पारुल देशपांडे, इगतपुरी
5. श्रीमती सरला पामिडी, इगतपुरी
6. श्रीमती रचना मेश्राम, यवतमाल
7-8. श्री राजेंद्र कुमार शर्मा तसेच श्रीमती शीला शर्मा, लखनऊ, उत्तर प्रदेश
9. Ms. Tan Tay Hoy, Malaysia

### बालशिबिर शिक्षक

1. श्रीमती योगिता वाडेर, सांगली
2. श्री वीरेंद्र वाडेर, सांगली
3. श्री प्रशांत हाटकर, तलेरे
4. श्री शिवकुमार शिवलिंगम, चेन्नई
5. श्रीमती सुषमा विश्वास खाड़े, कोल्हापुर
6. श्रीमती साधना संतोष तोले, पनवेल
7. श्री राजशेखरन सोरुबन, बेंगलुरु
8. श्री निकेश कसारे, पनवेल
9. श्रीमती माधुरी सुहास भोसले, कोल्हापुर
10. श्री विश्वास महादेव खाड़े, कोल्हापुर
11. डॉ. सुनील अंकुशराव नखाते, पनवेल
12. श्रीमती विश्लेषा निकेश कसारे, पनवेल

## पूज्य गुरुजी श्री सत्यनारायण गोयंकाजींच्या जन्म शताब्दी समारोहानिमित्त
### विश्व विपश्यना पगोडाच्या महाशिबिर कार्यक्रमांची यादी

| महिना | प्रस्तावित महाशिबिर दिनांक/वार | अवसर |
|---|---|---|
| मार्च २०२३ | १९ मार्च २०२३, रविवार | शताब्दी वर्ष महाशिबिर |
| मे २०२३ | ७ मे २०२३, रविवार | बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने |
| जून २०२३ | ११ जून २०२३, रविवार | शताब्दी वर्ष महाशिबिर |
| जुलै २०२३ | २ जुलै २०२३, रविवार | गुरु पौर्णिमेच्या निमित्ताने |
| ऑगस्ट २०२३ | २७ ऑगस्ट २०२३, रविवार | शताब्दी वर्ष महाशिबिर |
| सप्टेंबर २०२३ | १० सप्टेंबर २०२३, रविवार | शताब्दी वर्ष महाशिबिर |
| ऑक्टोबर २०२३ | १ ऑक्टोबर २०२३, रविवार | शरद पौर्णिमा व पूज्य गुरुजींच्या पुण्यतिथि निमित्ताने |
| नोव्हेंबर २०२३ | १९ नोव्हेंबर २०२३, रविवार | शताब्दी वर्ष महाशिबिर |
| डिसेंबर २०२३ | १० डिसेंबर २०२३, रविवार | शताब्दी वर्ष महाशिबिर |
| जानेवारी २०२४ | १४ जानेवारी २०२४, रविवार | संघ दान आणि महाशिबिर |
| फेब्रुवारी २०२४ | **समाप्ती समारोह : ४ फेब्रुवारी २०२४, रविवार** | **'डॉक्यूमेंट्री फिल्म' चे विमोचन आणि इतर कार्यक्रम** |

Registration link:- **oneday.globalpagoda.org**

For any other information- Tel :- 022-50427500 / +91 8291894644 • **Email: guruji.centenary@globalpagoda.org**

N.B. The QR code on top right corner contains informations regarding Centenary Program.

### दोहे धर्माचे

जय जय जय गुरुदेवजी, जय जय कृपानिधान।
धर्म रत्न असेच दिले, झाले परम कल्याण॥

असा चाखविला धर्म रस, विषय रस ना मोहवी।
धर्म सार असेच दिले, टरफल देत सोडवी॥

धर्म दिला कसा च सबळ, दर पावली आधार।
भय भैरव सारे मिटे, बनवी निर्भय अपार॥

जर गुरुदेव न भेटती, बरमा देश सुदेश।
तर मिथ्या च जंजाळात, जीवन जाते शेष॥

### दोहे धर्माचे

गुरुदेव तुमचीच कृपा, झडती कर्माचे क्लेश।
पुन्हा आली धर्माची, गंगा भारत देश॥

कर्ज भारत देशाचे, बर्मा देश च चुकवी।
कृपा श्री गुरुदेवांची, बंदा च नाव कमवी॥

पारस घडवी लोहाला, सुवर्ण च रे बनवी।
गुरुवर घडवी लोहाला, पारस च रे बनवी॥

गुरुवर तुमचा प्रतिनिधी, देतसे धर्म-दान।
सकलांचे होवो भले, जनजनांचे कल्याण॥

"विपश्यना विशोधन विन्यास" साठी प्रकाशक, मुद्रक व संपादक: राम प्रताप यादव, धम्मगिरी , इगतपुरी- 422 403, दूरध्वनी: (02553) 244086, 244076·
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, 259, सीकॉफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2566, फाल्गुन पौर्णिमा, 7 मार्च, 2023

वार्षिक शुल्क रु. 100/-, US $ 50, (भारताबाहेर पाठविण्यासाठी) रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK/286/2021-2023

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.) (किरकोळ विक्री होत नाही)
**DATE OF PRINTING: 21 FEBRUARY, 2023, DATE OF PUBLICATION: 07 MARCH, 2023**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत
फोन : (02553) 244076, 244086,
244144, 244440.
Email: vri_admin@vridhamma.org;
Course Booking: info.giri@vridhamma.org
Website: www.vridhamma.org